पीएच.डी
संशोधन आराखडा

“उदगीर व औसा तालुक्यातील पशुंचा तुलनात्मक अभ्यास”

सामाजिक शास्त्रे शाखेअंतर्गत भूगोल विषयातील पीएच.डी (विद्या वाचस्पती) या पदवीकरीता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यास सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

-: संशोधक :-
खडके सुरेखा बाबुराव
एम.ए., एम.फिल (भूगोल)

-: मार्गदर्शक :-
प्रा.डॉ.धनुश्वर रमेश शामराव
एम.ए.बी.एड् पीएच.डी (भूगोल)
भूगोल विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकुर
ता.चाकुर जि.लातूर

-: भूगोल संशोधन केंद्र :-
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

ऑगस्ट 2017

“उदगीर व औसा तालुक्यातील पशुंचा तुलनात्मक अभ्यास”

प्रस्तावना :-

भारत हा विविध प्राकृतिक रचनेने परिपूर्ण असलेला विस्तीर्ण देश आहे. उंच पर्वत डोंगर मैदाने बारमाही वाहणाऱ्या नद्या हे भारताचे वैशिष्ट्य आहे. भारतीय संस्कृतीचा विकास होण्यास पशुपालन व्यवसाय प्रेरक आहे. म्हणून पशुपालन व्यवसायाचा विकास होण्यासाठी सुयोग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

आपल्या देशात सद्या पशुपालन हा मुख्य व्यवसाय असून त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा वाटा आहे. या व्यवसायावर पशुपालक व त्यांची कुटुंबे अवलंबून आहेत. व्यावसायिक तत्त्वावर पशुपालन कसे फायदेशीर होईल याची माहिती असणे आवश्यक आहे.

एकोणिसाव्या व विसाव्या शतकात भारतात बरेच संशोधन होऊन सोयीसुविधा उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे पशुपालन करण्याकडे लोकांचा कल आहे हे प्रमाण ग्रामीण भागात जास्त आढळून येते. महाराष्ट्रात 96% खेड्यातील कुटुंबे शेळीपालन करत असून जगातील एकूण शेळ्यांची संख्या 59.2% कोटी असून त्यापैकी 20% म्हणजे 1200 कोटी शेळ्या भारतात आहेत. शेळ्यांच्या बाबतीत भारत देशाचा प्रथम क्रमांक लागतो. लातूर जिल्ह्यातील देवणी जातीचा वळू व लाल कंधारी बैल प्रसिद्ध आहेत.

पशुचा इतिहास

वैदिक काळ हा इ.स. पूर्व 2000 ते इ.स. पूर्व 800 वर्षाचा गणला जातो. या काळात आर्यांचे वास्तव्य होते तेव्हापासून गाय, मेंढी, म्हैस, बैल पशूपालनाचा उल्लेख आहे. नांगरण्यासाठी बैलाचा उपयोग केला जात असे. ऋग्वेद काळात गाय ही मुख्य संपत्ती मानली जात असे. राजाजवळ हजारो गायींची खिल्लारे असत व त्यातूनच ते ऋषी ब्राह्मणाला दक्षिणा देत असत. बैलास नांगरण्यापासून ते घरी धान्य आणण्यापर्यंत अनेक कामे करत असत.

मौर्यकाळात राजाची जनावरे राखण्यासाठी गुराखी नेमले जात कुरणे चरण्यासाठी राखीव ठेवत या कुरणावर सामायिक मालकी होती. पशुधनाचा संबंध समाज व्यवस्थेशी होता व मनुष्याची समाजातील प्रतिष्ठा त्यांच्याजवळ असलेल्या पशुधनावर अवलंबून होती.

व्याख्या :

सांस्कृतिक कोश

"निर्बुद्ध म्हणजे पशू होय."

एच.व्ही. मिचेल

"पशूची जोपासना करणे म्हणजे पशूपालन होय."

क्लार्क :

"ज्या प्राण्यांपासून मानवाला इजा होत नाही व ते प्राणी मानवासाठी उपयुक्त असतात त्यांना पशू म्हणतात."

पशुचा अर्थ :

पशुधन हा शब्द पशु+धन असा विभागला जातो. संयुक्तपणे पशू हा शब्द पुल्लिंगी असून त्याचा अर्थ जनावर निर्बुद्ध होतो.

पशुंचे महत्त्व

1) गाई व म्हशींपासून दूध हे उत्तम प्रतीचे प्राणीजन्य भरपूर प्रथिने असलेले नैसर्गिक खाद्य मनुष्यास मिळते. यापैकी 35 लाख लिटर दूध शासकीय व सहकारी संस्थामार्फत जमा केले जाते. राहिलेले 20 लाख लिटर दूध हे खाजगी व्यवसायातील उद्योगामार्फत जमा केले जाते.

2) बकरी, मेंढी, गाय, बैल यांचे उत्तम प्रतीचे मांस मिळते. शेळ्या-मेंढ्यापासून लोकर मिळते, तिचा वापर उबदार कपडे तयार करण्यासाठी केला जातो.

3) गाय व म्हशीपासून दूध मिळते तर बैल वाहतुकीसाठी व शेतीच्या मशागतीसाठी उपयोगात आणला जातो.

4) पशूपासून उत्तम प्रतीचे शेणखत, सेंद्रीय खत, उत्तम कीडनाशक म्हणून वापरतात. तसेच गायीचे गोमूत्र पवित्र म्हणून देवासाठी वापरतात.

5) जाळण्यासाठी शेणापासूनच्या गवऱ्याचा उपयोग केला जातो.

6) जनावराच्या हाडांपासून फॉस्फरस व कॅल्शियमयुक्त जनावर खाद्य व बोनमील खत मिळते.

7) जनावरांपासून कातडी मोठ्या प्रमाणात मिळते ती चामडी उद्योगात उपयोगी पडते. पशुधनाच्या चामड्यापासून बॅग्ज, पर्स, बुट, बेल्ट इत्यादी वस्तू बनविल्या जातात.

8) पशुसंवर्धनामुळे शेतीस पूरक धंदा मिळून शेतकरी कुटुंबाच्या उत्पादनात भर पडते व त्याची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होते.

अभ्यास क्षेत्र (Study Area)

कृषी व प्राणी हे अभ्यासक्षेत्रातील अर्थव्यवस्थेचा कणा आहे. या दोन्ही तालुक्यात शेतकरी व पशुपालक वर्ग मोठा आहे. संशोधक स्वतः लातूर जिल्ह्यातील आहे. लातूर हे महाराष्ट्रातील 36 जिल्ह्यापैकी एक असून उदगीरचे अक्षवृत्तीय स्थान $18^{0}22$’ उत्तर ते $77^{0}21$’ पूर्व रेखावृत्तादरम्यान आहे. औसा तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार $18^{0}25$’ आणि रेखावृत्तीय विस्तार $76^{0}5$’ आहे. लातूर जिल्ह्यातील उदगीर व औसा हे दोन महत्त्वाचे तालुके असून बालाघाट डोंगर रांगेत वसलेले आहेत. उदगीर तालुक्याचे क्षेत्रफळ 7626 हेक्टर किलोमीटर आहे. तर औसा तालुक्याचे क्षेत्रफळ 634 हेक्टर आहे. उदगीर हे लातूर जिल्ह्याच्या पूर्वेस असून औसा हे लातूर जिल्ह्याच्या दक्षिणेस असलेले तालुके आहेत. उदगीर हे बिदरपासून 80 कि.मी. अंतरावर असून औसा व उदगीर तालुक्यातील मृदा मॅग्नेशियम लोह, अल्कली अशा पोषक द्रव्याने संपन्न आहे. उदगीर येथे लेंडी नदी असून तेरणा व तावरजा नद्या औसा तालुक्यातून वाहतात. उदगीर व औसा तालुक्यात किल्ले असून ते प्राकृतिक शोभा वाढवतात. औसा येथील खरोसा लेणी प्रसिद्ध आहे. म्हणून ते एक पर्यटन स्थळ आहे. तसेच लेटेराईट, हेमेटाइट प्रकारच्या खडकात हिंदूधर्मीय लेणी आहेत.

उदगीर व औसा तालुक्यात गाई, म्हशी, शेळी, मेंढ्या व बैल पशूंचा वापर केला जात असल्यामुळे प्रस्तुत संशोधनात याचा अभ्यास करणार आहे.

उद्दिष्टे :- (Objectives)

1) औसा व उदगीर तालुक्यातील पशुवितरणाचा अभ्यास करणे.

2) औसा व उदगीर तालुक्यातील पशुधन आरोग्यावर परिणाम करणारे घटक अभ्यासणे.

3) अभ्यास क्षेत्रातील प्रमुख पशुरोगाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

4) पशूरोग नियंत्रण व उपचार पद्धतीचा अभ्यास करणे.

5) पशूरोग नियंत्रणाचे उपाय सुचिविणे.

गृहितके :- (Hypothesis)

1) जैवविविधता ही भिन्न गुणधर्म असणाऱ्या सजिवाची निश्चित परंपरावर अवलंबून असणारी शृंखला असते.

2) पर्यावरण व जैव विविधतेतील सजिवाचा घनिष्ट संबंध असून बदलत्या पर्यावरणावर पाळीव प्राण्यांच्या गुणवैशिष्ट्यांमध्ये बदल होत जातो.

3) पाळीव प्राण्यांचे संवर्धन केल्यास रोजगार निर्मितीत वाढ होईल.

अभ्यास पद्धती (Methodology)

प्रस्तुत अभ्यासासाठी आवश्यक असणारी माहिती द्वितीय स्वरुपाची असून या माहितीच्या आधारे उदगीर व औसा तालुक्यातील इ.स.1997 ते इ.स.2012 या काळातील गाय, बैल, शेळी, मेंढी, म्हैस याचा तुलनात्मक अभ्यास केला जाणार आहे.

पशूचे वितरण काढण्यासाठी डिके (1965) यांच्या वितरणाच्या सूत्राचा उपयोग केलेला आहे.

$$\text{पशूचे वितरण} = \frac{\text{विशिष्ट पशूधन}}{\text{एकूण पशूधन}}$$

1) पशु लोकसंख्या वाढीचा शेकडा दर

r = पशू लोकसंख्या वाढ (%)

P_o= दोन जनगणनेपैकी सुरुवातीची जनगणना

P_1= दोन जनगणनेपैकी नंतरची जनगणना

2) $$\text{पशू लोकसंख्येची घनता} = \frac{\text{तालुक्यातील एकूण पशू लोकसंख्या}}{\text{तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ (चौ.कि.मी.)}}$$

$$3)\quad \text{सरासरी पशू} = \frac{\text{निवडलेल्या पशूची एकूण बेरीज}}{\text{एकूण पशू}}$$

या व्यतिरिक्त संख्याशास्त्राचा वापर करून योग्य ते निष्कर्ष काढण्यात येतील.

विषय सामग्रीचा आढावा

भूगोलामध्ये जैव विविधतेवर विशेषतः पाळीव प्राण्यांवर संशोधन साहित्य मर्यादित आहे. प्राणी भूगोल ही भूगोल शास्त्राची एक नवीन उपशाखा आहे. प्राणी भूगोलाचा अभ्यास सर्वप्रथम अल्फेड, रुसेव वॉलेस यांनी 1876 मध्ये केला. त्यावेळेस त्यांनी प्राण्यांचे भौगोलिक वितरण हा अभ्यास केला.

डॉ.शरचंद्र नथुजी देसाई (1973) मध्ये चारा पिके गायराने व्यवस्थापन यांचा अभ्यास केला. डॉ.गिवबने एच.एन. यांनी दुग्धव्यवसाय आर्थिक विकासाची गुरूकिल्ली (उस्मानाबाद जिल्हा) हा अभ्यास केला. डॉ.शांती लाहोटी (2008) मध्ये पशु व्यवस्थापनातील पारंपरिक ज्ञानाची ओळख व त्याचा स्वीकार या संदर्भात संशोधन केले आहे. वीर शरद किसनराव यांचे 'पाळीव प्राण्यांच्या विशेष संदर्भासह बीड तालुक्यातील जैव विविधतेचा भौगोलिक अभ्यास' केला आहे. डॉ.शेळके मन्मथ केरबा यांनी 'लातूर जिल्ह्यातील शेतीचा स्थल कालपरत्वे बदलाचा अभ्यास' केला आहे. पटेल शहाना यांनी 'हिंगोली जिल्ह्यातील पशुपालनाचा अभ्यास' केला आहे. गौड नामदेव यांनी 'लातूर जिल्ह्यातील पाळीव प्राण्यांच बाजारपेठांचा स्थळ व कालसापेक्ष भौगोलिक विश्लेषण' यांचा अभ्यास केलेला आहे.

माहिती संकलन

प्रत्यक्ष साधनसामुग्री (प्राथमिक)

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनासाठी प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे माहिती घेतली जाणार आहे. माहिती प्रश्न आराखडा स्वरूपात व प्रत्यक्ष प्रश्नोत्तरामुळे मौखिक व लेखी स्वरुपात माहिती संकलित केली जाणार आहे.

दुय्यम साधनसामग्री

पुस्तके, संदर्भ ग्रंथ, संशोधन पर लेख, संशोधन पत्रिका, वर्तमानपत्रे, इंटरनेट आदि साधनांचा दुय्यम स्त्रोत म्हणून वापर करण्यात येणार आहे.

प्रकरण योजना

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रकरण दुसरे - पूर्व साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे - औसा व उदगीर तालुक्यातील पशु वितरण व वितरणावर परिणाम करणारे घटक

प्रकरण चौथे - औसा व उदगीर तालुक्यातील पशु आरोग्यावर परिणाम करणारे घटक

प्रकरण पाचवे - पशुरोग, पशुखाद्य, निवारा यांचा तुलनात्मक अभ्यास

प्रकरण सहावे - निष्कर्ष व उपाययोजना

संदर्भ ग्रंथ

१. डी.एस.सूर्यवंशी, पश्चिम खानदेशातील पशुपालन : भौगोलिक विश्लेषण, महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधन

२. डॉ.घारपुरे (जुलै १९९०) जैविक भूगोलशास्त्र, प्रकाशन मनोहर पिंपळापुरे

३. डॉ.चतुर्भज मामोरिया, भारत का बृहद भूगोल, साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा

४. डॉ.सुरेश फुले - कृषी भूगोल, विद्याभारती प्रकाशन, लातूर

५. डॉ.दिवाकर कुलकर्णी व नितीन मार्कण्डेय (१९९८) ठाणबद्ध पद्धतीसह सविस्तर शेळीपालन, रेणुका प्रकाशन, परभणी

६. डॉ.विरेन्द्रसिंह चव्हाण एवं अलका गौतम भारत का विस्तृत भूगोल, रस्तोगी पब्लिकेशन, मेरठ

७. पशुसंवर्धन सांख्यिकी पुस्तिका (१९९१-२०११)

८. प्रा.के.ए.खतीब (१९९२) भारताचा कृषी भूगोल, मेहता पब्लिकेशन, सदाशिव पेठ, पुणे

९. माजीद हुसेन (२०००) कृषी भूगोल, रावत पब्लिकेशन, जयपूर

१०. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर - लातूर जिल्हा (१९९१)

११.	डॉ.माजीद हुसेन - मानवी भूगोल, अनुवाद के.सागर

१२.	हुसैन आणि सिंह - भारत, मध्यप्रदेश, हिंदी ग्रंथ अकादमी

१३.	पवार, पाटील, आडसुळ (१९९७) मानवी भूगोल, सप्रेम प्रकाशन, कोल्हापूर

१४.	सु.प्र.दाते, लक्ष्मण मालुसरे : मानवी भूगोल

१५.	चतुर्भजू मेमोरिया, मानवी भूगोल, साहित्य भवन पब्लिकेशन आगरा

संशोधक
खडके सुरेखा बाबुराव

मार्गदर्शक
प्रा.डॉ.धनुश्वर रमेश शामराव
(एम.ए.बी.एड् पीएच.डी)
भूगोल विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकुर
ता.चाकुर जि.लातूर